**L. A. BILL No. XXVII OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७.

### मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१८८८ चा ३. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक २ नोव्हेंबर २०२१ रोजी,

२०२१ चा महा. अध्या.११. मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२१, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

(शा.म.मु.) एचबी १०९५—१ (८००——१२-२०२१)

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २ नोव्हेंबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १५४ ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), कलम १५४ मध्ये, पोट-कलम (१ड) मधील, खंड (अ) मध्ये, — १८८८ चा ३.

(एक) उप-खंड (एक) मधील, "२०२०-२१ या वर्षी" या मजकुरानंतर "व २०२१-२२ या वर्षी" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-खंड (दोन) मधील, "२०२०-२०२१" या मजकुरानंतर "व २०२१-२०२२" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(तीन) उप-खंड (तीन) मधील,—

(अ) "२०२१-२०२२ या वर्षी" या मजकुराऐवजी "२०२२-२०२३ या वर्षी" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) "२०२०-२०२१ या वर्षी" या मजकुरानंतर "व २०२१-२०२२ या वर्षी" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**३.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, परंतु या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे निदेश, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे देता येतील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला कोणताही आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येईल.

सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२१, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२१ चा महा.अध्या. ११.

(२) अशाप्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदीन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा ३) याच्या कलम १३९ च्या खंड (१) मध्ये, मालमत्ता कर लादण्यासंबंधी तरतूद आहे. उक्त अधिनियमाच्या कलम १५४ मध्ये, मालमत्ता कर आकारणीयोग्य असलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे पट्टीयोग्य मूल्य किंवा भांडवली मूल्य निर्धारित करण्याची तरतूद आहे. उक्त कलम १५४ च्या पोट-कलम (१अ) मध्ये, त्याखाली नमूद केलेले घटक लक्षात घेऊन, आयुक्ताकडून मालमत्ता कर आकारणीयोग्य असलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे भांडवली मूल्य निश्चित करण्याची तरतूद आहे. त्याच्या पोट-कलम (१क) मध्ये अशी तरतूद आहे की, उक्त कलम १५४ च्या पोट-कलम (१अ) अन्वये निश्चित केलेल्या कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या भांडवली मूल्यात दर पाच वर्षांनी सुधारित करण्यात येईल आणि २०२०-२०२१ या वर्षामध्ये अशी सुधारणा करण्याचे नियत होते.

२. तथापि, कोविड-१९ या सार्वत्रिक साथरोगाचा फैलाव झाल्यामुळे, राज्य शासनाकडून तसेच केंद्र सरकारकडून टाळेबंदी घोषित करण्यात आली होती, त्यामुळे लघुउद्योग, शैक्षणिक संस्था, विकास कामे, कारखान्यातील कामकाज, विविध औद्योगिक क्षेत्रे, दैनंदिन कार्ये, इत्यादींवर प्रतिकूल आर्थिक परिणाम झालेला आहे. म्हणून, सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ द्वारे उक्त अधिनियमाच्या कलम १५४ मध्ये नवीन पोट-कलम (१ड) जादा दाखल केले होते; जेणेकरून, उक्त कलम १५४ च्या पोट-कलम (१अ) अन्वये निश्चित केलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे भांडवली मूल्य, २०२०-२१ या वर्षात सुधारित करण्यात येणार नाही आणि कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे मालमत्ता कर देयक, २०१९-२०२० यावर्षी जे होते तेच २०२०-२०२१ या वर्षासाठी असेल; आणि उक्त पोट-कलम (१ड) मध्ये अन्य परिणामस्वरूप तरतुदीदेखील केल्या होत्या.

कोविड-१९ या साथ-रोगाचा फैलाव झाल्यामुळे अजुनही तशीच परिस्थिती असल्यामुळे, उक्त कलम १५४ याच्या पोट-कलम (१ड) मध्ये सुधारणा करणे इष्ट वाटले, जेणेकरून, उक्त कलम १५४ च्या पोट-कलम (१अ) अन्वये निश्चित केलेल्या इमारतीचे किंवा जमिनीचे भांडवली मूल्य, २०२१-२२ या वर्षात सुधारित करण्यात येणार नाही आणि कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे मालमत्ता कर देयक, २०१९-२०२० यावर्षी जे होते तेच असेल आणि ते २०२२-२०२३ या वर्षात सुधारित करण्यात येईल.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा ३) यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक २ नोव्हेंबर २०२१ रोजी मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२१ (२०२१ चा महा. अध्या.११), हा प्रख्यापित केला होता.

४. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१.

**एकनाथ शिंदे,**
नगर विकास मंत्री

## सन २०२१ चे वि.स. विधेयक क्रमांक २७-मंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट

**(मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ यातील उतारे)**

**(सन १८८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३)**

**१.** ते **१५३.** ** ** ** ** ** ** ** **

**१५४.** (१) ** ** ** ** ** ** ** ** पट्टीयोग्य मूल्य किंवा भांडवली मूल्य कसे निर्धारित करण्यात यावे.

(१अ) ते (१क) ** ** ** ** ** ** ** **

"(१ड) (अ) पोट-कलम (१क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(एक) कोविड-१९ या सार्वत्रिक साथरोगाचा फैलाव झाल्यामुळे, पोट-कलम (१अ) अन्वये निश्चित केलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे भांडवली मूल्य, २०२०-२०२१ या वर्षी सुधारित करण्यात येणार नाही ;

(दोन) कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे मालमत्ता कर देयक, २०१९-२०२० या वर्षी जे होते तेच २०२०-२०२१ या वर्षासाठी असेल ;

(तीन) पोट-कलम (१अ) अन्वये निश्चित केलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे भांडवली मूल्य, जणू काही खंड (एक), २०२०-२०२१ या वर्षी लागू नव्हता असे समजून, २०२१-२०२२ या वर्षी सुधारित करण्यात येईल ;

(ब) ** ** ** ** ** ** ** **

(२) ** ** ** ** ** ** ** **

**१५४अ ते ५२८.** ** ** ** ** ** ** ** **

**अनुसूची.** ** ** ** ** ** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७.]**

**[ मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
नगर विकास मंत्री.**]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.